# जाहीरनामा

Covid-१९ आजाराचा प्रतिबंध करणेसाठी जिल्हा/महानगरपालिका पातळीवरून चालू असलेले कामकाज व माहिती उदा. Containment Zone ,रुग्णालये ,तपासण्या ,मृत्यु ,बरे झालेले रुग्ण ,रोज निदान झालेले रुग्ण ,O२ Bed, Ventilater व **"माझे कुटुंब - माझी जबाबदारी "**मोहिम या सर्वांची माहिती पूर्ण कोकण विभागातील जिल्ह्यांकडून व महानगरपालिकांकडून संकलित करून त्यावरील संस्करण अहवाल तयार करणे याकरीता अद्ययावत सॉफटवेअर तयार करून घेणे आवश्यक आहे. सदर सुविधा उपलब्ध करून देणकामी खालील संगणक प्रणाली तयार करून देणेसाठी इच्छुक कंत्राटदाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

1. Konkan Division A1 to E format intregration in web portal and develop graphical inter face base on A1 to E format for all District Collectors.

**कंत्राटाच्या अटी व शर्ती:-**

१. संगणक प्रणाली तयार करणा-या कंत्राटदारास किमान ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
२. कंत्राटदाराने संस्था नोंदणीकृत असलेबाबतचा संबंधित यंत्रणेकडील दाखला जोडणे आवश्यक आहे.
३. संगणक प्रणाली कार्यारंभ आदेश मिळाल्यापासुन १० दिवसात तयार करुन द्यावी लागेल.
४. कंत्राटदाराने संस्थेचा जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असलेचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.
५. कंत्राटदाराने संगणक प्रणाली तयार करणेचा दर व त्यावरील जीएसटी स्वंतत्र नमूद करावा.
६. संगणक प्रणाली तयार करताना सर्व अधिकृत सॉफटवेअर्स वापरण्याची जबाबदारी हि कंत्राटदाराची असेल.
७. संगणक प्रणालीव्दारे तयार होणा-या विविध अहवालांमध्ये दैनंदिन अथवा जेव्हा गरज पडेल तेव्हा बदल करून देण्याची कंत्रादाराची तयारी असणे आवश्यक आहे. तसे कंत्राटदाराने दरपत्रक सादर करताना स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
८. संगणक प्रणाली हि कोणत्याही व्हायरस पासून सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी हि कंत्राटदाराची असेल.
९. संगणक प्रणाली तयार केल्यानंतर किमान ६ महिने विना शुल्क सपोर्ट देणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.
१०. संगणक प्रणालीतुन तयार होणा-या सर्व विदेची (Data) मालकी हि विभागीय आयुक्त यांची असेल.
११. प्रस्तुत कामासाठी जो दर ठरविण्यात येईल तो अंतिम असेल व त्या व्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त मोबदला मिळणार नाही.
१२. काम पूर्ण झाल्याशिवाय कोणताही मोबदला मिळणार नाही.
१३. जीएसटी अथवा इतर कर भरण्याची जबाबदारी हि कंत्राटदाराची असेल.
१४. कंत्राटदाराने आयकर परतावा आयकर कार्यालयात सादर करीत असलेबाबतचा पुरावा.
१५. जर कोणत्याही कारणास्तव सदर संगणक प्रणाली योग्यरित्या काम करीत नाही, असे विभागीय आयुक्त यांचे निदर्शनास आले आणि जर कंत्राटदाराने त्याची दुरुस्ती केली नाही, तर कंत्राटदाराच्या बिलाच्या रकमेतून सदर दंड वसूल करण्याचा अधिकार विभागीय आयुक्त यांचा असेल.

तरी वरील काम करून इच्छिना-या कंत्राटदारांनी त्यांचे दरपत्रक सीलबंद पाकिटात दि.०९/१०/२०२० रोजी सायंकाळी ०५.१५ वाजेपुर्वी या कार्यालयास सादर करावेत. प्राप्त दरपत्रके हे दि.१२/१०/२०२० रोजी सायंकाळी ०५.१५ वाजता उघडण्यात येतील, याची ईच्छुकांनी नोंद घ्यावी.

(अण्णासाहेब मिसाळ)
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग

Scanned with CamScanner